पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर

NAAC Accredited-2015

'B' Grade (CGPA-2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर
## दरपत्रकाबाबत

जा.क्र.सोविसो/वि.व.ले/ख.भां.वि/२०२०/ 646 दि. 14 AUG 2020

प्रति,

--------------------

--------------------

--------------------

सोलापूर विद्यापीठाकडील संकुले व प्रशासकीय विभागाकडे असलेल्या संगणकासाठी अॅन्टीव्हायरससाठी इच्छुक असणाऱ्या पुरवठादारांकडून वार्षिक दरकरामधुन खरेदीसाठी दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी आपले दरपत्रक सोबत जोडलेल्या परिशिष्ट मध्ये खालील नमूद केलेल्या तारखेपुर्वी कार्यालयीन वेळेत पोहोच करावेत. सदर दरपत्रका सदंर्भातील सविस्तर माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| तपशील |
|---|
| **Antivirus for १ Year & ३ Year Validity** |
| **Generally any antivirus software should:-** |
| १) **Quick heal / NPAV total Security**<br>२) Stop the viruses in real-time before they reach the PC<br>३) Clean and protect from all virus types like file virus, boot sector and partition table Malwares, Spywares, Worms etc<br>४) Detect and stop intrusion of new and unknown worms into computer.<br>५) Update from single update server. Internet connection is not required on all PCड्स<br>६) Perform startup Scan.<br>७) Solve internet problems i.e. reduce unwanted traffic. |

ठेक्याची मुदत कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे. या बाबतीत मा.कुलगुरू जो निर्णय घेतील तो संबधित ठेकेदारावर बंधनकारक राहील. या ठेक्याची मुदत करारातील अटी व शर्ती कायम ठेऊन गरजेनुसार विद्यापीठ आणि ठेकेदार यांच्या संमतीने वाढविली जाऊ शकेल.

१) दरपत्रकासंदर्भात काही शंका / अडचणी असल्यास संबधितांनी दूरध्वनी क्र. ०२१७-२७४४७६२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

२) वरील कामाचे दरपत्रक सूचना पुअहो सोविसो http:su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Quotation या शिर्षकाखाली उपलब्ध आहे.

३) इतर अटी व शर्ती दरपत्रकामध्ये पाहावयास मिळतील.

४) ज्या ठेकेदाराचे दरपत्रक मंजूर होईल त्यांना पुरवठा आदेश देण्यात येईल.

५) दरपत्रक प्रक्रियेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | दरपत्रक प्रकाशित दिनांक व वेळ | १४/०८/२०२० | | वित्त व लेखा विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, सोलापूर-पुणे महामार्ग केगांव, सोलापूर-४१३२५५ |
| २ | दरपत्रक स्विकारण्याची दिनांक व वेळ | १४/०८/२०२० | | |
| ३ | दरपत्रक सादर करणे अंतिम दिनांक व वेळ | २१/०८/२०२० | सायं ६.०० | |
| ४ | दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | २४/०८/२०२० | दुपारी ०३.०० | |

वित्त व लेखा अधिकारी

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## दरपत्रक (Quotation)

| Description | Rate for 1 year | Rate for 3 years |
|---|---|---|
| Generally any antivirus software should<br>1) Stop the viruses in realtime before they reach the PC.<br>2) Clean and protect from all virus types like file virus, boot sector and partition table, Malwares, Spywares, Worms etc.<br>3) Detect and stop intrusion of new and unknown worms into computer.<br>4) Update from single update server. Internet connection is not required on all PCs.<br>5) Perform startup scan.<br>6) Solve internet problems i.e. reduce unwanted traffic. | Quick heal<br><br>NPAV-Total security | |

वरील दर सर्व करासहित आहेत.

दिनांक

ठेकेदाराची/पुरवठादाराची स्वाक्षरी व शिक्का

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## वित्त व लेखा (खरेदी व भांडार विभाग)

## दरपत्रकासाठी लागणारी तांत्रिक बाबींची कागदपत्रे (लिफाफा क्र.१)

१ . मुंबई दुकाने व संस्था नियम, १९४८ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व अंतिम दिनांक

२ . संस्थेचे PAN नंबर

३. वस्तू व सेवाकर (GST) नोंदणी प्रमाणपत्र.

४. संगणक प्रणाली (Software) विकसित करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव , ग्राहक सुची जोडणे बंधनकारक आहे.

५. संगणक प्रणाली (Software) विकसित केलेली यादी- संस्थेच्या प्रमाणपत्रासह

४ . सुचना व अटी सही मान्य असल्याबाबत स्वाक्षरी व शिक्क्यानिशी.

दिनांक :

(निविदाधारकाची / दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व शिक्का)

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## -: सुचना व अटी :-

१. दरपत्रक सीलबंद लिफाफा मधून मा.कुलसचिव, पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर- पुणे राष्ट्रीय महामार्ग केगांव, सोलापूर-४१३२५५ यांच्या नांवे सर्वसाधारण विभागामध्ये पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

२. दोन लिफाफा पध्दतीत दरपत्रक दाखल करावे. लिफाफा क्र.१ (तांत्रीक बाबी) पुर्ततेसाठी उदा : निविदा अर्जात नमुद केलेली सर्व कागदपत्रे व सुचना व अटी सही शिक्क्यानिशी लिफाफा क्र.१ मध्ये जोडावीत.

३. लिफाफा क्र. २ हा दराचा असून सदर लिफाफा मध्ये दर द्यावेत. दोनही लिफाप्यावरती ॲन्टीव्हायरस वार्षीक दरकराराकरीता असा स्पष्ट उल्लेख करावा.

४. जाहिरातीतील दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

५. दरपत्रक सादर करताना बयाणा रक्कम रु. ५,०००/- मा. वित्त व लेखाअधिकारी, पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या नांवे वित्त व लेखा विभागाकडे रोखीने भरल्यास तशी पावती अथवा धनाकर्षाने भरल्यास धनाकर्ष निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अनामत रकमेशिवाय आलेले दरपत्रक रद्द समजण्यात येईल.

६. दरपत्रक सादर करताना आपले दर सर्वकरांसहित व कार्यालयीन पोहोच द्यावेत.

७. दरपत्रक मान्य करताना फक्त दराचाच विचार केला जाणार नसून पुरवठादाराच्या सेवासंहितेचा विचार केला जाईल.

८. विद्यापीठातील विविध विभागांकडून ॲन्टीव्हायरसचा पुरवठा आदेश दिल्यापासून जास्तीत जास्त सात दिवसामध्ये ॲन्टीव्हायरसचा पुरवठा करावा. अन्यथा प्रति दिवस रुपये ५०/- प्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

९. ॲन्टीव्हायरसचे देयक मंजूर दराप्रमाणे आदा करण्यात येईल व सदर कालावधीत कोणत्याही कारणास्तव मुदतवाढ मिळणार नाही.

१०. सदर वार्षिक दरकरारांतर्गत दर मंजूर झाल्यानंतर संबंधित पुरवठाधारकाने ७ दिवसाच्या आत सुरक्षा ठेव म्हणून रक्कम रुपये ७,५००/- इतकी रक्कम भरावी लागेल. सदरची रक्कम करार नाम्यातील कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर परत देण्याचे आहे. त्याचप्रमाणे लिहून देणार यांनी प्रस्तुत मक्त्याचा पोटमक्ता देण्याचे नाही. तसे आढळल्यास पस्तुतचा करारनामा रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत.

११. ॲन्टीव्हायरसच्या देयकामधून नियमानुसार सर्व करांची कपात करण्यात येईल.

१२. सदर करार मुदतीत कोणत्याही प्रकारे वाद उपस्थित झाल्यास ते Arbiteration and Conciliation सोलापूर येथेच सोडविण्याचे राहील.

१३. वरील प्रमाणे अटी व शर्तीचा भंग लिहून देणार यांनी केल्यास सदरचा करार कोणतीही पूर्व कल्पना न देता रद्द करण्याचे व आवश्यक वाटल्यास सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत.

१४. ज्या निविदा धारकास वरील अटी मान्य असतील त्यांनी वरील अटी मान्य असल्याचे लेखी रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून दयावा लागेल.

१५. पुरवठा आदेशामधील साहित्याची तात्काळ गरज नसल्यास, पुरवठा वेळापत्रक गरजेनुसार मागणी पुरवठा आदेशामध्ये अंतर्भूत केली जाईल.

१६. मान्य झलेल्या दरात कोणत्याही कोणताही बदल अथवा दरात वाढ करून मिळणार नाही.तथापि शासनाकडून दरातील कराची रक्कम/टक्केवारी कमी/जास्त झाल्यास त्यामुळे दरामध्ये होणाऱ्या बदलाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा.कुलगुरु महोदय यांना राहतील.

१७. कांही कारणास्तव पुरवठादराने दरकरार कालावधीत साहित्याचा पुरवठा करण्याचे नाकारले तर आवश्यक साहित्याची खरेदी विद्यापीठ खुल्या बाजारातुन करेल व त्यापोटी झालेले नुकसान पुरवठाधारकाकडून वसूल केले जाईल.

१८. पुरवठादारांसोबत केलेल्या दरकराराचा कालावधी पुर्ण होईपर्यंत सुरक्षा ठेव म्हणून ठेवलेली अनामत रक्कम पुरवठाधारकांना परत केली जाणार नाही.

१९. पुरवठाधारकांना पुरवठा आदेश मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत साहित्याचा पुरवठा न केल्यास पुन्हा सात दिवसाच्या मुदतवाढीने पुरवठा आदेश देण्यात येईल. मुदतवाढीने दिलेल्या पुरवठा आदेशाच्या कालावधीमध्ये साहित्याचा पुरवठा न केल्यास आपल्या सोबत केलेला दरकरार रद्द करुन आपली सुरक्षा ठेवीची रक्कम जप्त करण्यात येईल.

२०. वरील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत.

स्थळ :

दिनांक :

दरपत्रकधारकाचे/ निविदाधारकाचे नांव

स्वाक्षरी व शिक्का